॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B++' grade

Phone : (02462) 215525 **DEPARTMENT OF STUDENTS DEVELOPMENT** Website: srtmun.ac.in

Fax : (02462) 215572 E-mail: dir.dsd@srtmun.ac.in

जा.क्र./ वि.वि.वि./ २०२४-२५/ दिनांकः – १७ /०२ /२०२५

प्रति,

मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये,

मा. संचालक, सर्व शैक्षणिक संकुले विद्यापीठ परिसर.

मा. संचालक विद्यापीठ उप परिसर पेठ, लातूर व उप परिसर परभणी.

मा. प्राचार्य, न्यू मॉडल डिग्री कॉलेज, हिंगोली.

मा. समन्वयक कै.उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट.

विषय:- उच्च शिक्षणासाठी शैक्षणिक प्रवेश व विविध प्रकारच्या शैक्षणिक सवलती मिळण्यासाठी आवश्यक असलेल्या जात प्रवर्गाचे दाखले, जात वैधता प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर, उत्पन्नाचा दाखला, अधिवास दाखला इत्यादीसाठी शेवटच्या क्षणी होणारी धावपळ टाळण्यासाठी महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थी व पालक यांना जागृत करण्यासाठी मोहिम राबविणेबाबत.

वाचा:- अध्यक्ष अखिल भारतीय मराठा महसंघ यांचे पत्र क्र. १०६/२०२५ दि.२९.०१.२०२५

महोदय,

उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार आपणास कळविण्यात येते की, विषयांकित नमुद दाखल्यांसाठी महसूल विभाग, जात वैधता पडताळणी समित्या यांचेकडे विद्यार्थी व पालक शैक्षणिक प्रवेशाच्या वेळी अंतिम तारखेच्या अलिकडे धावपळ करीत असतात. विविध प्रकारचे आवश्यक दाखले मिळविण्यासाठी आवश्यक पुरावे, दस्तावेज अशा अनेक प्रकाराची माहिती व त्याचे दाखले पालकांना संकलित करावे लागतात. राज्य समाईक प्रवेश परिक्षा विभाग CET CELL यांच्या संकेतस्थळावर रजिस्ट्रेशन केल्यानंतर प्रवेश प्रकियेचे टप्पे पार पाडत असताना हे दाखले आवश्यक असतात. तसेच विद्यार्थ्यांना विविध प्रकाराचे शैक्षणिक प्रतिपूर्ती / शिष्यवृत्ती / निर्वाह भत्ता मिळविण्यासाठी अशा दाखल्यांची आवश्यकता असते. याबाबत बरेसचे विद्यार्थी व पालकांची अनभिज्ञता, अपुरी माहिती यामुळे शेवटच्याक्षणी शासकीय यंत्रणेवर ताण येतो.

उपरोक्त पाश्वभूमीवर विद्यार्थ्याची धावपळ व ताण कमी करुन त्यांना सर्व प्रकराचे दाखले वेळेवर मिळावेत यादृष्टीने 'वेगवेळ्या दाखल्यांसाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता कशी करावी' व 'विविध प्रकराचे दाखले काढण्याच्या कार्यपध्दती' याबाबत विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन स्तरावर मार्गदर्शन करणे तसेच विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी महाविद्यालयांच्या नोटीस बोर्डवरील सूचना, डिजीटल माध्यामांद्वारे (SMS Whatsapp) जनजागृती मोहीम राबविण्याबाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे. तरी सदर परिपत्रकाची छायांकीत प्रत यासोबत सलग्न करण्यात येत असून सदर परिपत्रक विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे व त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी. ही विनंती.

डॉ. सूर्यप्रकाश जाधव
संचालक,
विद्यार्थी विकास विभाग.

प्रत माहितीस्तव :

सिस्टीम एक्सपर्ट . ( संगणक विभाग ) सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर Circular Regarding " **उच्च शिक्षणासाठी शैक्षणिक प्रवेश व विविध प्रकारच्या शैक्षणिक सवलती मिळण्यासाठी आवश्यक असलेल्या जात प्रवर्गाचे दाखले, जात वैधता प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर, उत्पन्नाचा दाखला, अधिवास दाखला इत्यादीसाठी शेवटच्या क्षणी होणारी धावपळ टाळण्यासाठी महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थी व पालक यांना जागृत करण्यासाठी मोहिम राबविणेबाबत..** या शीर्षकाखाली विद्यापिठाच्या संकेत्रस्थळावरील Home Page मधील Administration आणि Students Development सदराअंतर्गत प्रसिध्द करावे.

स्वा.रा.ती.म.विद्यापीठ,नांदेड
कुलसचिव कार्यालय
10 FEB 2025
आवक क्र. 7694

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य,**
**४१२,ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजी नगर, पुणे-४११०१६**
**Web : www.dhepune.gov.in** **E-Mail : mavi.dhepune@gov.in**
फोन नं.०२०/२६१२२११९

क्र. उशिसं/मवि-१/ वि. पा. जागृत मोहीम/२०२५/ ई ऑफीस- १२४९०३३ दि. /०२/२०२५

## परिपत्रक

विषयः- उच्च शिक्षणासाठी शैक्षणिक प्रवेश व विविध प्रकारच्या शैक्षणिक सवलती मिळण्यासाठी आवश्यक असलेल्या जात प्रवर्गाचे दाखले, जात वैधता प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर, उत्पन्नाचा दाखला, अधिवास दाखला इत्यादीसाठी शेवटच्या क्षणी होणारी धावपळ टाळण्यासाठी महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थी व पालक यांना जागृत करण्यासाठी मोहिम राबविणेबाबत.

वाचाः- अध्यक्ष अखिल भारतीय मराठा महसंघ यांचे पत्र क्र.१०६/२०२५ दि.२९.०१.२०२५

उपरोक्त विषयाबाबत वाचा येथील दि.२९.१.२०२५ च्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे. कृपया अवलोकन करावे.

विषयांकित नमुद दाखल्यांसाठी महसूल विभाग, जात वैधता पडताळणी समित्या यांचेकडे विद्यार्थी व पालक शैक्षणिक प्रवेशाच्या वेळी अंतिम तारखेच्या अलिकडे धावपळ करीत असतात. विविध प्रकारचे आवश्यक दाखले मिळविण्यासाठी आवश्यक पुरावे, दस्तावेज अशा अनेक प्रकाराची माहिती व त्याचे दाखले पालकांना संकलित करावे लागतात. राज्य समाईक प्रवेश परिक्षा विभाग CET CELL यांच्या संकेतस्थळावर रजिस्ट्रेशन केल्यानंतर प्रवेश प्रकियेचे टप्पे पार पाडत असताना हे दाखले आवश्यक असतात. तसेच विद्यार्थ्यांना विविध प्रकाराचे शैक्षणिक प्रतिपूर्ती / शिष्यवृत्ती / निर्वाह भत्ता मिळविण्यासाठी अशा दाखल्यांची आवश्यकता असते. याबाबत बरेसचे विद्यार्थी व पालकांची अनभिज्ञता, अपुरी माहिती यामुळे शेवटच्याक्षणी शासकीय यंत्रणेवर ताण येतो.

उपरोक्त पाश्वभूमीवर विद्यार्थ्यांची धावपळ व ताण कमी करुन त्यांना सर्व प्रकराचे दाखले वेळेवर मिळावेत यादृष्टीने 'वेगवेळया दाखल्यांसाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता कशी करावी' व 'विविध प्रकराचे दाखले काढण्याच्या कार्यपध्दती' याबाबत विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन स्तरावर मार्गदर्शन करणे तसेच विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी महाविद्यालयांच्या नोटीस बोर्डवरील सूचना, डिजीटल माध्यामांद्वारे (SMS Whatsapp) जनजागृती मोहीम राबविण्याबाबत कार्यवाही होणे आवश्यक ठरते.

विषयांकित प्रकरणी आपल्या कार्यकक्षेतील सर्व शासकीय /अशासकीय, अनुदानित /विनाअनुदानित/ कायम विनाअनुदनित महाविद्यालयांना योग्य ती कार्यवाही करणेबाबत आपल्या स्तरावरुन सूचित करण्यात यावे.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 07-02-2025 18:33:40
**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)**
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१६.

DSD/NSS

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
२. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.



रजि क्र. - ६६९ ए          स्थापना - इ.स. १९००

# अखिल भारतीय मराठा महासंघ



पुणे कार्यालय : रायरेश्वर, ब्लॉक नं. जी, १३५८, सदाशिव पेठ, गद्रे चेंबर्स, १ ला मजला, बाजीराव रस्ता, पुणे - ४११०३०.
टेलीफोन : (०२०) २४४६२४४३ | Website : www.marathamahasangh.org | Email : marathamahasangh1981@gmail.com



o अध्यक्ष - राजेंद्र नामदेवराव कोंढरे o उपाध्यक्ष - नरेंद्र अण्णासाहेब पाटील, विनायकराव पवार, वसंतराव मुळीक o सरचिटणीस - प्रकाश वसंत देशमुख
o कोषाध्यक्ष - प्रमोद बळवंत जाधव o संयुक्त सरचिटणीस - गुलाब नामदेव गायकवाड o चिटणीस - अतिश उत्तमराव गायकवाड


जावक क्र. १०६/२०२५          दिनांक : २९/०१/२०२५

प्रति,
**मा. डॉ. शैलेंद्र देवळांणकर,**
संचालक उच्च शिक्षण विभाग,
महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर
पुणे - ४११००५

**विषय : उच्च शिक्षणासाठी शैक्षणिक प्रवेश व विविध प्रकारच्या शैक्षणिक सवलती मिळण्यासाठी आवश्यक असलेल्या जात प्रवर्गाचे दाखले, जात वैधता प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर, उत्पन्नाचा दाखला, अधिवास दाखला इ. साठी शेवटच्या क्षणी होणारी धावपळ टाळण्यासाठी महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थी व पालक यांना जागृत करण्यासाठी मोहिम राबविणे बाबत विनंती.**

महोदय,

विषयांकित नमूद दाखल्यांसाठी महसूल विभाग, जात वैधता पडताळणी समित्या यांचेकडे विद्यार्थी व पालक शैक्षणिक प्रवेशाच्या अंतिम तारखेच्या अलिकडे धावपळ करत असतात. जात वैधता प्रमाणपत्र देणा-या राज्यामधील ३६ जात वैधता पडताळणी समित्या असून त्यापैकी फक्त ४ जिल्हा समित्यांना अध्यक्ष असून उर्वरित ३२ समित्यांना अध्यक्ष नसल्याने या समित्यांचा कार्यभार या ४ अध्यक्षांवर आहे. तसेच आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तयारी करण्यासाठी महसूल विभागातील अधिकारी कर्मचारी गुंतून राहण्याची शक्यता आहे.

विविध प्रकारचे आवश्यक दाखले मिळविण्यासाठी आवश्यक पुरावे, दस्तावेज, अशी अनेक प्रकारची माहिती व त्याचे दाखले पालकांना संकलित करावे लागतात. राज्य सामाईक प्रवेश परिक्षा विभाग CET CELL यांच्या संकेतस्थळावर रजिस्ट्रेशन केल्यानंतर प्रवेश प्रक्रियेचे टप्पे पार पाडताना जात वैधता प्रमाणपत्र हे आवश्यक असते. तसेच विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या शैक्षणिक प्रतिपुर्ती/ शिष्यवृत्ती, निर्वाह भत्ता मिळण्यासाठी दाखल्यांची आवश्यक्ता महत्वाची आहे. याबाबत बरेसचे विद्यार्थी व पालकांची अनभिज्ञता, अपुरी माहिती यामुळे शेवटच्या क्षणी सरकारी यंत्रणेकडे धाव घेतात. यंत्रणेवर येणारा ताण लक्षात घेता विद्यार्थ्यांनी सर्व दाखले वेळेत काढावेत व धावपळ टाळावी यासाठी महाविद्यालयीन स्तरावर जागरुकता आणण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन तसेच पालकांना महाविद्यालयाच्या SMS, Whatsapp यंत्रणेच्या माध्यमातून, महाविद्यालयाच्या नोटीस बोर्डवर, लाउड स्पीकरवरुन तसेच प्राध्यापक यांचे मार्फत जागृती करण्यासाठी आपल्या विभागाकडून तातडीने महाविद्यालयांना आदेश द्यावे हि विनंती.

आपले नम्र,

राजेंद्र कोंढरे
अध्यक्ष
अखिल भारतीय मराठा महासंघ

**प्रत : मा. आयुक्त CET CELL, मुंबई ४००००१**
**मा. संचालक तंत्रशिक्षण, मुंबई ४००००१**
**मा. महासंचालक बार्टी, पुणे**


प्रशासकीय कार्यालय : ई/९-३ व ४, देशमुख निवास, एस. जी. बर्वेनगर को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., घाटकोपर-पश्चिम, मुंबई - ४०० ०८४.
नोंदणीकृत कार्यालय : ५ नवलकर लेन, वि. प. रस्ता, प्रार्थना समाज जवळ, गिरगांव, मुंबई - ४०० ००४.